N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. District (जिल्हा): पुणे ग्रामीण P.S.(ठाणे): खेड
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0467 Year (वर्ष): 2024
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):07/08/2024 07:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):
1. Day(दिवस): दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 31/07/2024
Date To ( दिनांक पर्यंत): 06/08/2024
Time From (वेळेपासून): 07:00 बजे
Time To (वेळेपर्यंत): 13:48 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक ): 07/08/2024 Time (वेळ): 07:34 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):
Entry No. (नोंद क्र.): 007
Date & Time (दिनांक आणि वेळ): 07/08/2024 07:34 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी
5. Place of Occurrence (घटनास्थळ):
1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 40 किमी Beat No. (बिट क्र.):
(b) Address (पत्ता): पशु वैद्यकीय दवाखाना कुडे बु,खेड

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यारा):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री मंगेश सिताराम बुरूड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुडे बुद्रुक , खेड ,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुडे बुद्रुक , खेड ,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8055101210

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. बंडु बबन देवकर | | | 1. चास बाजारपेठ शेजारी,खेड , खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक- 07/08/2024

मी श्री मंगेश सिताराम बुरूड, वय 30 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मु.पो. कुडे बुद्रुक ता. खेड जि. पुणे मोबा.क्र. 8055101210

समक्ष खेड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन माझे कुटुंबासोबत नमुद पत्यावर राहण्यास आहे.

मी दिनांक 19/07/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे तक्रार दिली की, "मी दि. 15/12/2021 रोजी पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय योजना दुधाळ गाय/म्हैस वाटप करणे यामधून गाय/म्हैस खरेदी करणेकरीता अनुदान मिळणेकामी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला होता. अर्ज सादर केलेनंतर सदर अर्ज 5 वर्षापर्यंत ग्राहय असतो. 5 वर्षात योजनेचा लाभ न मिळाल्यास पुन्हा नव्याने अर्ज सादर करावा लागतो.

वरीलप्रमाणे अर्ज सादर केल्यानंतर सन 2023 मध्ये आमचे गावातील कार्यरत श्री. बंडु बबन देवकर पशुधन पर्यवेक्षक, पशुवैदयकिय दवाखाना कुडे बु यांनी मला त्यांचे सदर दवाखान्यात बोलावून सांगितले की, वर नमूद योजनेची लाभार्थी यादी जाहीर झाली असून तिच्यामध्ये माझे नाव प्रतिक्षायादीमध्ये आले आहे. सदर प्रतिक्षा यादीतील माझे नाव अंतिम यादीमध्ये आणुन मला सदर योजनेचा लाभ मिळवून देतो असे सांगुन श्री देवकर यांनी माझेकडे रु.10,000/- पैशाची मागणी केली. त्यावेळी मी नाईइलाजास्तव रु.2000/- श्री देवकर यांना दिले होते. परंतु त्यावेळी वरिल योजनेच्या लाभार्थी अंतिम यादीमध्ये माझे नाव आले नाही.

त्यानंतर दि. 18/06/2024 रोजी श्री देवकर यांनी त्यांचा मोबाईल क्र. 9770706935 वरून माझे मोबाईल क्र. 8055101210 यावर संपर्क करून यावर्षी देखील माझे नाव प्रतिक्षा यादीमध्ये कायम असून ते अंतिम यादीमध्ये आणुन देण्यासाठी रु. 10,000/- पैशाची माझ्याकडे मागणी केली असता मी त्यांना मागील वर्षी सदर कामाकरीता रु.2000/- दिल्याची आठवण करून दिली. त्यावर त्यांनी रु.10,000/- ऐवजी रु.7,000/- दया असे बोलून माझेकडे पैशाची मागणी केली.

त्यानंतर दि. 29/07/2024 रोजी व तत्पुर्वी श्री देवकर यांनी त्यांचे वरिल नमूद मोबाईल क्रमांकावरून माझे नमूद क्रमांकावर वारंवार फोन करून माझे वरिल कामासाठी माझेकडे रु.7000/- पैशाची मागणी केली. श्री देवकर हे मागणी करीत असलेली सदर रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसून ती लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री झाली आहे व ती त्यांना देण्याची माझी इच्छा नाही. मला श्री देवकर यांनी माझे वरिल कामासंदर्भात पुन्हा दि. 30/07/2024 रोजी भेटण्यास बोलाविले आहे.

तरी श्री देवकर, पशुधन पर्यवेक्षक यांचे विरुध्द आपले विभागामार्फत योग्य ती शासकीय कारवाई होणे माझी विनंती आहे. श्री देवकर व माझेत यापुर्वीचे कोणतेही आर्थिक व्यवहार नसून पुर्ववैमनस्य नाही." वगैरे मजकुराची लेखी तक्रार दिली होती.

माझे तक्रारीनुसार श्री. बंडु बबन देवकर, पशुधन पर्यवेक्ष, कुडे बुद्रुक ता. खेड जि. पुणे यांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबतचे पडताळणी करण्यात आली. दि.31/07/2024 रोजी झालेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक यांचेशी फोनवर संभाषण झाले असता लोकसेवक श्री देवकर यांनी पैशाचा उल्लेख केला परंतु सदर पडताळणीमध्ये स्पष्ट मागणी झाली नाही.त्यांनतर दि.01/08/2024 रोजी पडताळणी केली असता लोकसेवक श्री देवकर हे कडु बु येथे आले नाहीत त्यामुळे पडताळणी झाली नाही. .05/08/2024 रोजी केलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री देवकर यांनी मी शासकिय अनुदानातुन गाई मिळणेसाठी केलेल्या ऑनलाईन अर्जाचे अनुषंगाने माझे



Scanned with CamScanner

नाव लाभार्थीचे अंतिम यादीमध्ये आणुन योजनेचा लाभ मिळवुन देणेकरीता लोकसेवक देवकर यांनी माझेकडे 7000 रुपये लाच रक्कमेपैकी 5000 रुपये लाच रक्कमेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर दि.06/08/2024 रोजी सापळा कारवाईचे दरम्यान लोकसेवक देवकर यांनी मला " "बर काय तुझ पटकनी बोल" असे बोलले असता मी त्यांना "किती दयायचे" असे विचारले असता त्यांनी मला "पाच हजार रुपये दे आता" असे बोलल्यानंतर मी अँथ्रासिन पावडर लावलेली रक्कम त्यांचे समोर धरली असता ती त्यांनी पंचासमक्ष स्वीकारली.

तरी दि. 31/07/2024 रोजी 07.00 ते दि.06/08/2024 रोजी 13.48 वा चे दरम्यान पशुवैद्यकिय दवाखाना, कुडे बु ता. खेड जि. पुणे येथे लोकसेवक श्री. बंडु बबन देवकर वय 43 वर्षे, व्यवसाय - शासकीय नोकरी पद- पशुधन पर्यवेक्षक नेमणुक- पशुवैदयकिय दवाखाना, कुडे बु ता. खेड जि. पुणे यांनी माझे पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय योजना दुधाळ गाय/म्हैस वाटप करणे यामधून गाय/म्हैस खरेदी करणेकरीता अनुदानीत रक्कम मिळणेकामी माझ नाव अंतिम यादीमध्ये आणुन देवून सदर योजनेचा मला लाभ मिळवून देणेसाठी माझेकडे पडताळणीमध्ये 5000/रुपयाची लाचेची मागणी करून रु.5000/- रक्कम पंचासमक्ष सापळा कारवाईदरम्यान स्वीकारली म्हणून माझी लोकसेवक श्री बंडु देवकर यांचे विरुध्द फिर्याद असून कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAJKUMAR BALAJI KENDRE(I (Inspector)) / POBN70363 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
खेड पोलीस स्टेशन जि.पुणे(ग्रा.)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAJKUMAR BALAJI KI
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN70363



Scanned with CamScanner